N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

रोहा पोलीस ठाणे जिल्हा - रायगड

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** रोहा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0108 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/06/2022 01:06 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 22/06/2022

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/06/2022

**Time From (वेळेपासून):** 12:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:55 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/06/2022 **Time (वेळ):** 00:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/06/2022 01:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा परीषद बांधकाम ,उप विभाग रोहा रायगड, शाखा अभियंता कार्यालय ,रोहा ता रोहा जि रायगड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** पांडुरंग सिताराम सानप मो न 9158468685

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1951 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मू पो शेणवई, ता रोहा, रायगड,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मू पो शेणवई, ता रोहा, रायगड,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.भोजवंता अमतराव शिंदे शाखा उप अभियंता रायगड जिल्हा परिषद | | | 1. रू नं 403 ,दिव्याक्षी सो सा 4था माळा ,खारेगाव कलया जि ठाणे ,सध्या रा रोहा ,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आरोपीने फिर्यादीकडून लाच स्वरूपात स्विकारलेले 10000 रू ACB ने पंचासमक्ष जप्त केले | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 22/06/2022 मी श्री.पांडुरंग सिताराम सानप, वय 71 वर्षे, रा.शेणवई, पो.शेणवई, ता.रोहा, जि.रायगड (मोबाईल नंबर 9158468685) समक्ष रोहा पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. आमचे गाव मौजे शेणवई ता.रोहा जिल्हा रायगड येथील सामाजीक सभागृह तयार करणेबाबतचा कार्यारंभ आदेश दिनांक 07/01/2021 रोजी श्री.सतिश सुधाकर घरत मु.पो.थळ, चाळमळा ता.अलिबाग यं◌ाचे नावे 4,94,748/- रू.या अंदाजपत्रकीय दराचे नावे पारीत झाला होता. सदर सामाजिक सभागृहाचे बांधकाम श्री.सतिश घरत हे त्यांचे वैयक्तीक अडचणीमुळे प्रत्यक्ष ठिकाणावर हजर राहुन करून घेवू शकत नसल्याने त्यांनी सदर सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी, त्याबाबत लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी, सभागृहाचे बांधकाम पुर्ण झाल्यावर श्री.घरत यांचे वतीने बिलासाठी पाठपुरावा करून बिले मंजूर करून घेणे याबाबतचे मुख्यात्यारपत्र मला दिनांक 01/03/2022 रोजी दिलेले आहे. दिनांक 06/03/2022 रोजी मी बांधकामाची सुरूवात केली. दरम्यान दिनांक 15/03/2022 रोजी श्री.शिंदे साहेब, कनिष्ठ अभियंता, रायगड जिल्हा परिषद यांनी कामाचे ठिकाणी भेट दिली व काम ठिक झाले नसून तुमची अनामत रक्कम थांबवून ठेवण्यांत येईल. व बिलाची रक्कम अदा करण्यं◌ात येणार नाही. अनामत रक्कम व बिलाची रक्कम मिळणेकरीता तुम्हाला 10,000/- रूपये दयावे लागतील असे सांगितले. व काम पुर्ण झाल्यावर भेटण्यास या असे मला सांगितले. मी श्री.शिंदे यांचे कार्यालयात वेळोवेळी जावून बिलाबाबत माहीती घेतली असता माझे बील मंजूर झाले नसल्याचे मला समजले. त्यानंतर मी दिनांक 21/06/2022 रोजी उप अभियंता, बांधकाम रायगड जिल्हा परिषद उप विभाग रोहा कार्यालयात गेलो असता श्री.शिंदे साहेब हे कार्यालयात हजर नव्हते. त्यांचे कार्यालयातील कर्मचारी श्री.धनावडे यांनी त्याच्या स्वतःच्या मोबाईलवरून श्री.शिंदे साहेब यांना काल करून माझे बोलणे शिंदे साहेबांशी करून दिले असता, शिंदे साहेबांनी उदईक दिनांक 22/06/2022 रोजी 10.00 वाजता उप अभियंता, बांधकाम रायगड जिल्हा परिषद उप विभाग रोहा कार्यालयात या असे मला सांगितले. यावरून माझी खात्री झाली की मी बांधकाम पुर्ण केलेल्या मौजे शेणवई सामाजिक सभागृहाच्या बांधकामाचे प्रलंबीत बील मंजूरी व अनामत रक्कम परत मिळण्यासाठी कनिष्ठ अभियंता श्री.शिंदे रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभाग हे 10,000/- रू. लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने श्री. शिंदे कनिष्ठ अभियंता, यांचेवर योग्य ती कारवाई होणेकरीता मी दिनांक 21/06/2022 रोजी पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे, अन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांचेकडे शेणवई ता.रोहा येथे तक्रार दिली. पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने मला दिनांक 22/06/2022 रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरुध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल. त्या अनुषंगाने दिनांक

22/06/2022 रोजी 10.00 वा. रोहा रेल्वे स्टेशन जवळील सी.डी.देशमुख कालेज रोडलगत हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दिनांक 22/06/2022 रोजी सकाळी 10.30 वा. मी रोहा रेल्वे स्टेशन जवळील सी.डी.देशमुख कालेज रोडलगत हजर राहीलो. तेथे पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांची भेट घेतली. त्यांनी त्यांचे सोबत हजर असलेले इसमांपैकी दोन इसम पंच साक्षीदार असल्याचे सांगून त्यांची नावे 1) श्री.दिलीप उध्दव शेळके, मत्स्य क्षेत्र निरीक्षक, सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय रायगड- अलिबाग, 2) श्री.सुनिल यशवंत भोई, वसुली अधिकारी, सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय रायगड- अलिबाग यांचे कार्यालय अशी असून त्यांचेशी ओळख करून दिली. तसेच सोबतच्या पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली. पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचांस माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या आणि 10.55 वा. माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकार्डरध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी पडताळणीकरीता शासकिय बोलेरो जिप एमएच06/सीडी 1508 ने पंच श्री.दिलीप उध्दव शेळके यांचेसह उप अभियंता, बांधकाम रा.जि.प., उपविभाग रोहा कार्यालयात जाण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 11.02 वाजता माझे कडे व्हाईस रेकार्डर सुरू करून देण्यात आले. मी शासकिय बोलेरो जिप एमएच06/सीडी 1508 ने चालक सहा.फौ.श्री.घरत पंच क्र.1 श्री.शेळके यांचेसह निघून रोहा बाजारपेठेतुन, रोहा कोर्टाचे आवारात गेलो. तेथे चालक सहा.फौ. /श्री.घरत यांनी शासकीय जिप थांबिवली. त्यानंतर मी व पंच असे जिपमधुन उतरून उप अभियंता, बांधकाम रा.जि.प., उपविभाग रोहा कार्यालयात गेलो व श्री. शिंदे यांची भेट घेतली. व माझे कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्री.शिंदे यांनी मला विचारले की, किती लाखाचे काम आहे तुमचं ? त्यावर मी पाच असे सांगीतले असता त्यावर लोकसेवक श्री.शिंदे यांनी पाच दुणे दहा असे बोलून 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना काहीतरी कमी करा, असे बोललो असता, हिशोबाने द्या असे बोलले. त्यावर मी त्यांना जावु मग असे विचारले असता, त्यांनी देताय ना असे बोलले, त्यावर मी त्यांना घेवुन येतो आहात ना तुम्ही असे विचारले असता, हो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री.दिलीप शेळके असे शासकिय बोलेरो जिप एमएच06/सीडी 1508 ने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी सांगितले की, सदर संभाषणावरून लोकसेवक श्री.शिंदे यांनी मागणी केल्याप्रमाणे बांधकामाचे प्रलंबीत बील मंजूर करणेकरीता व अतिरिक्त अनामत रक्कम परत देण्याकरीता 10,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम त्यांच्याकडे आणून देण्याबाबत सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी श्री.शिंदे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरवून त्या अ◌ुनषंगाने सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करून योग्य त्या सूचना दिल्या. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांनी माझेकडे 10,000/- रूपये आहेत काय असे विचारले असता माझेकडे 10,000/- रूपये असल्याचे सांगितले. त्यामुळे पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांनी लाचेची रक्कम म्हणून 10,000/- रूपये घेवून पाठविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे माझे कडील 500/-रू.दराच्या 20 नोटा असे 10,000/- रूपये रक्कम सापळा कारवाईकरीता वापरण्याकरीता पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांचेकडे हजर केली. त्यानंतर माझे कडे अंथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 10,000/- रूपये माझे शर्टाचे समोरील डावे खिशामध्ये ठेवले, त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सुषमा सोनावणे यांनी मला, पंचानं◌ा, पथकातील अंमलदार यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 12.32 वाजता माझी तसेच पंचांची वक्तव्य घेवून त्यानंतर सापळा कारवाई करीता माझेकडे व्हाईस रेकार्डर चालू करून माझे पं◌ॅटचें समोरील डावे खिशात ठेवून शासकीय बोलेरो जिपमध्ये मी, पंच नंबर 1 श्री. दिलीप शेळके, पोलीस उप अधीक्षक, श्रीमती सोनावणे, पोह/महेश पाटील व चालक सहा.फौ. घरत असे व खाजगी वाहन टाटा टिगोर क्र. एमएच 06/बीयु 4352 ने पोहवा/विनोद जाधव, पोना/जितेंद्र पाटील, पोह/करकरे, पंच नं.2 श्री. भोई असे 12.43 वा. निघुन रोहा बाजारपेठेतुन उप अभियंता, बांधकाम राजिप उपविभाग रोहा कार्यालयाचे अलिकडे रस्त्यावर दोन्ही वाहने कोणास संषय येणार नाही अषा स्थितीत थांबविण्यात आली. त्यानंतर मी व पंच श्री.शेळके शासकीय जिप मधुन उतरून उप अभियंता बांधकाम, राजिप उपविभाग रोहा कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच नं. 2 व सापळा पथकामधील अधिकारी व अमंलदार असे उप अभियंता, बांधकाम राजिप, उपविभाग रोहा कार्यालयाच्या परिसरात कोणास संषय येणार नाही अषा रितीने थांबुन राहीले. त्यानंतर मी कार्यालयात जावुन लोकसेवक श्री.शिंदे यांना भेटलो असता, लोकसेवक श्री.शिंदे यांनी मला बोला काका काय असे बोलुन हाताचे इशा-याने लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सागितल्याप्रमाणे लाचेची रक्कम घेवुन आलो असल्याचे सांगितले व बिलाबद्दल सांगितले असता, उद्या सही करतो असे सांगितले. त्यानंतर मी माझे शर्टचे डावे खिशातील लाचेची रक्कम माझे उजवे हाताने काढुन लोकसेवक श्री.शिंदे यांचेसमोर धरली असता, लोकसेवक श्री.शिंदे यांनी लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून, त्यांचे शर्टचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी त्यांना तेवढ जरा करा, असे बोललो असता, देतो- देतो, काका देतो असे बोलले. त्यानंतर मी कार्यालययाचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा रितीने लाच घेतल्याचा पुर्व नियोजित इषारा म्हणजेच माझे डोक्यावरील कप डावे हाताने काढुन डावे हातात धरली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे, सापळा पथकातील कर्मचारी व पंच नंबर 2 असे माझेजवळ आले. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांनी मला लाचेची रक्कम कोणी स्विकारली आहे याबाबत विचारले असता मी लाचेची रक्कम लोकसेवक श्री.शिंदे यांनी स्विकारली असल्याचे खुणेने सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांचे सुचनेवरून पोह/जाधव यांनी श्री.शिंदे यांचे दोन्ही हात मनगटाजवळ धरून घट्ट पकडले ती वेळ 12-55 वाजताची होती. त्यानंतर लोकसेवक श्री.शिंदे यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. अषा रितीने श्री.भोजवंता अमृतराव शिंदे, वय-37 वर्षे, शाखा अभियंता, उप अभियंता बांधकाम, रायगड जिल्हा परिषद, उपविभाग रोहा यांचे कार्यालय यांनी मौजे शेणवई सामाजिक सभागृहाचे बांधकामाचे प्रलंबित बिल मंजुर करणेकरीता व अतिरिक्त अनामत रक्कम परत देणेकरीता दिनांक 22/06/2022 रोजी 11.02 ते 11.23 वाजण्याचे दरम्यान त्यांचे कार्यालयात पंचासमक्ष 10,000/- रू.लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक 22/06/2022 रोजी 12.55 वाजता 10,000/- रूपये त्यांचे कार्यालयात स्विकारताना अंन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचेकडून हस्तगत केली. म्हणुन माझी श्री.भोजवंता अमृतराव शिंदे, वय-37 वर्षे, शाखा अभियंता, उप अभियंता बांधकाम, रायगड जिल्हा परिषद, उपविभाग रोहा यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे. ही फिर्याद दिली, सही ( पांडुरंग सिताराम सानप ) दि. 22/06/2022 समक्ष पोलीस उपअधिक्षक श्रीमती सोनावणे अंन्टी करप्शन ब्युरो, रायगड

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PRAMOD DNYANESHWAR BABAR(I (Inspector)) / PBMH69131 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
रोहा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** PRAMOD DNYANESHWAR BAE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH69131

प्रत मिळाली

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)